# प्रबोध अर्थ संचय

१०७० शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, पुणे - ४११ ००२
दूरध्वनी - ०२० ६९०१ ५५००

२२/०६/२०२५

सादर सस्नेह नमस्कार,

२०२५ -२६ च्या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीतील प्रबोधमधील आपल्या गुंतवणुकीवरील गेल्या तीन महिन्यांचे लाभवृत्त पाठताना मनःपूर्वक आनंद होत आहे.

गेले तीन महिने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दोन्ही आघाड्यांवर अनेक नाट्यमय व घुसळून टाकणाऱ्या घटना पहावयास मिळाल्या. २२ एप्रिलला पहेलगाम येथे पर्यटकांवर पाक पुरस्कृत मोठा दहशतवादी हल्ला झाला. त्यामुळे देशभरात संतापाची एकच लाट उसळली व त्याची परिणती 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये झाली. तीनच दिवसाच्या या ऑपरेशनमध्ये भारताने निर्विवादपणे आक्रमक पावले उचलून आवश्यक आणि योग्य तो धडा पाकिस्तानला शिकवला. युध्द म्हटल्यानंतर कदाचित आपले थोडेफार नुकसान झाले असेल, पण पाकिस्तानला आपण निश्चितच बॅकफूटवर नेले.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी संधिसाधूपणा साधून युध्दविरामाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला असला तरी, दहशतवादाला प्रत्युत्तर म्हणून आपण केलेला हल्ला पुरेसा होता, असे माझे स्वतःचे मत आहे. या निमित्ताने आपल्या मित्र व शत्रू राष्ट्रांची पुरेशी पारखही आपल्याला करता आली. चीन, पाकिस्तान, तुर्कस्थान, अझरबैजान व काही मुस्लिम राष्ट्रे ही आपल्या विरोधी उभी राहिली, तर अमेरिकेने दोन्ही डगरींवर पाय ठेवायचा प्रयत्न केला. खरं तर आपण स्वतःच आत्मनिर्भर आणि बलवान असले पाहिजे हा संदेश सर्वतोपरी महत्त्वाचा वाटतो. आपल्या सर्वपक्षीय खासदारांची शिष्टमंडळे विविध देशांत पाठवून जागतिक जनमत आपल्याकडे वळविण्यासाठी मोदींनी हुशारीने पावले टाकली, असे दिसते.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांनी निवडून येण्यासाठी मोठ मोठ्या वल्गना केल्या होत्या. टॅरिफ वॉर प्रकरणात त्यांनी खूपच उलटसुलट व असंबध्द भूमिका घेतल्या व त्यातून ते अत्यंत बेभरवशाचे आहेत असा भरवसा मात्र निश्चितच निर्माण झाला. त्यांच्या या प्रयत्नांना फारसे यश आलेले दिसत नाही. अमेरिकेतच सरकार विरोधी मोठमोठी निदर्शने या सर्व काळात झाली / होत आहेत. एलॉन मस्क सारख्या सहकाऱ्यालाही झिडकारतांना ते रोज नवीन शत्रू निर्माण करत आहेत असे दिसते. इस्त्रायल - गाझा युध्द, रशिया - युक्रेन युध्द तर ते रोखू शकलेच नाहीत. याउलट इस्त्रायल - इराण संघर्षाची त्यात भरच पडली आहे. या सर्व संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जगच एका मोठ्या अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलले गेले आहे.

विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे गेल्या तीन महिन्यात जागतिक शेअरबाजारामध्ये मोठे चढउतार दिसले. क्रूड तेलाचे भाव वाढले. रुपया घसरला तर सोन्या चांदीने भावाचे नवनवीन उच्चांक केले.

या सर्व अनिश्चिततेच्या काळात आपल्या देशाची अर्थव्यवस्था त्यातल्या त्यात स्थिरपणे पावले टाकताना दिसत आहे. चांगल्या मान्सूनचे भवितव्य वर्तवले गेले आहे. महागाईची वाढ स्थिर आहे. या सर्व पार्श्वभूमीवर रिझर्व बँकेने व्याजदर घटविण्याचे धाडसी पाऊल उचलले आहे. असे असले तरी प्रबोधने मात्र आत्ताच्याच दराने आपणास लाभ मिळत राहतील असे योजले आहे.

येत्या १३ जुलैला माझ्या वडिलांच्या स्मरणार्थ 'शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरिअल ट्रस्ट'च्या वतीने एक पुरस्कार वितरण कार्यक्रम योजला आहे. त्याचे निमंत्रण आपणास स्वतंत्रपणे धाडीतच आहोत. त्या प्रसंगी आपली प्रत्यक्ष भेट व्हावी, अशी इच्छा व्यक्त करतो.

कळावे, लोभ वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

धन्यवादपूर्वक,

आपला,

मोहन चिमणलाल गुजराथी